**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२६/२०१८**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**नि.क्र.५९ लगत**

नाव – सुरेश विष्णू तरडे,
वय – ७२ वर्षे धंदा –शेती
राहणार –बामणोली तर्फ कुडाळ, ता.जावली, जि.सातारा

**वादीतर्फे सा.क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.बी.विधाते यांचेमार्फत सुरु–**

माझ्या वडिलांचे पुर्ण नाव विष्णू भाऊ तरडे असे आहे. शंकर भाऊ तरडे हे माझे चुलते आहेत. त्यांना जयसिंग, मोहन व आनंदा ही तीन मुले आहेत. राऊ भाऊ तरडे हे माझे सर्वात मोठे चुलते आहेत. त्यांना संपत, अंकुश व प्रल्हाद ही तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सचिन, संदिप ही माझी धाकटी पत्नी कुसूम सुरेश तरडे यांच्यापासून झालेली मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कुसूम, सचिन, संदिप व मी दत्त मंदिराकडे जाणा–या रस्त्याजवळ असणा–या शेतात बांधलेल्या घरी राहतो. हे म्हणणे खरे आहे की, पहिली पत्नी हिराबाई हिला रुपाली नावाची मुलगी असून ती भुईंज येथील भोसले यांच्या इथे दिलेली आहे. हिराबाई ही गावात असणा–या दोन खण घरात राहते. सदरचे घर हे माडीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माडीच्या घराचा मिळकत नंबर सध्या ५०२ असा असून जुना नं. २४५ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांना तामखडा, खालचा वड, आरद बिगा, गव्हळ, मळवी, वाडी व गावठाण अशा नावांच्या शेत मिळकती होत्या. हे म्हणणे खरे आहे की, १९७७ साली शंकर भाऊ, राऊ भाऊ व विष्णु भाऊ यांच्यात सदर मिळकतींचे वाटप झाले. सदर वाटपाचा फेरफार हा १२९८ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला एकूण तीन मिळकती आल्या. त्याचे गट नं.९९, ६१९ व २५६ असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.९९ चा जुना सर्वे नं.०१ असा होता. त्याचे नाव तामखेडा असे होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ६१९ हा वाडीकडील असून त्याचा जुना सर्वे नं.६१/२ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गव्हळ या शेताचा गट क्र. २५६ हा असून जुना सर्वे नं.२५/६/७/८/९ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावठाणलगतचे क्षेत्र होते ते राऊ भाऊ व शंकर भाऊ यांना गेले. हे म्हणणे खरे आहे की,

गावठाणजवळ जे परडे आहेत त्यांचा गट क्र. १०५२ व १०५३ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ९९, ६१९ व २५६ या व्यतिरिक्त मला कोणतीही मिळकत आलेली नाही. मला परडयाचा गट नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, परडयाचा जो भाग आहे तो शेतमिळकतीचा गट आहे. हे म्हणणे खरे आहे की, तामखडा हा मुळचा १९ आरचा होता. हे म्हणणे खरे आहे की, राऊ भाऊ, शंकर भाऊ, विष्णू भाऊ यांच्या मुलांना ६–६ गुंठे आले होते. विष्णू भाऊ यांना एकच मुलगा नामे सुरेश म्हणजे मीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, भाऊ तरडे यांची वंशावळ मी दिलेली नाही. प्रल्हाद राऊ तरडे यांच्याकडून ६ गुंठे क्षेत्र १९९१ मध्ये खरेदी केलेले आहे. त्याचा फेरफार ३८१ झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, शंकरच्या सर्व वारसांकडून २०१० मध्ये ६ गुंठयाचे क्षेत्र माझा मुलगा सचिन सुरेश तरडे याच्या नावावर घेतले व त्याची नोंद फेरफार नं.७६८ ने झाली. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश राऊ तरडे यांच्याकडून गट क्र.६२० मधील ८ गुंठे क्षेत्र १९९२ साली खरेदी केले. त्याची नोंद फेरफार क्र.४२८ ने झाली. हे मला आता सांगता येणार नाही की, गट क्र. ६२० चा जुना सर्वे नं.६१/१ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६२० हा ८ आर क्षेत्राचा संपुर्ण गट आहे. हे म्हणणे खरे आहे की, राऊ भाऊ व शंकर भाऊ यांचे प्रत्येकी अडीच खणाचे घर मी खरेदी केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी राऊ भाऊ, शंकर भाऊ यांच्या सर्व घर मिळकती खरेदी केलेल्या आहेत. माझी पहिली पत्नी ज्या घरी राहत होती त्या घराला सध्या कुलूप आहे. साक्षीदार सांगतो की, दोन वर्षापासून ती आजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, राऊ भाऊ व जयसिंग ज्यांच्याकडून खरेदी केलेल्या घराची मी विक्री केलेली आहे. ती विक्री मी शंकर बाळकृष्ण तरडे व संगिता बाळकृष्ण तरडे यांना केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती शेजारील गट क्र. १०५३ हा हणमंत कोंडीबा तरडे यांनी संपत राऊ तरडे यांच्याकडून खरेदी घेतलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, २००५ साली हणमंत यांनी सुरेश धोंडीबा तरडे यांना म्हणजे प्रतिवादी क्र.१ ला विकला. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०५२ हा शंकर बळवंत तरडे यांनी शंकर भाऊ तरडे यांच्याकडून २००५ साली खरेदी केला. हे म्हणणे खरे आहे की, शंकर बळवंत तरडे यांनी तो प्रतिवादी क्र.१ ला विकला. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या लगत दक्षिण दिशेला गट क्र.१०५२, १०५३, १०५४ व १०५५ हे गट नंबर आहेत. गट क्र. १०५५ हा प्रतिवादी क्र.१ चा वडिलार्जित गट आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही राऊ भाऊ, शंकर भाऊ व विष्णू भाऊ यांच्या मालकीची

आहे असे मागितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही खरेदीची नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला माझे एकटयाचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत माझ्या एकटयाच्या नावे कशी झाली याबाबत मी ग्रामपंचायतीचा ठराव, सभेचे प्रोसेडिंग इ. कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या एकटयाच्या नावे कधी झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या एकटयाच्या नावे झालेल्या मिळकतीचे वर्णन वेगळे आहे व राऊ भाऊ, शंकर भाऊ व विष्णू भाऊ यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन वेगळे आहे.

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांच्या विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

मेढा. (रविंद्र भ. खवले)

दि.१७/१२/२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.